जाहीरात

**आरोग्य विभाग जिल्हा परिषद जालना**
**तदर्थ वैद्यकिय अधिकारी यांची कंत्राटी पध्दतीने पदे भरण्याकरीता**
**दिनांक २२/०९/२०२६ ते २८/०९/२०२६ पर्यंत अर्ज स्विकारण्यात येतील**
**मुलाखती (Interview) दिनांक २९/०९/२०२६ सकाळी ११.०० वाजता**

मा.जिल्हाधिकरी,जालना यांचे अध्यक्षतेखाली गठीत्त करण्यात आलेल्या निवड समितीद्वारे आरोग्य सेवा, छत्रपती संभाजीनगर मंडळांतर्गत असलेल्या जालना जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्र, येथील महाराष्ट्र वैद्यकिय आरोग्य सेवा (गट-अ) साठी ०६ तदर्थ वैद्यकिय अधिकारी म्हणुन कंत्राटी पध्दतीने फक्त ११ महिन्यांचे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात (पदांची संख्या कमी किंवा अधिक होऊ शकते) खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन भरावयाची आहेत

१. सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी याची नियुक्ती ११ महीन्यांसाठी किंवा सदर पदावर एम.बी.बी.एस. अर्हताधारक नियमित/ बंधपत्रित वैद्यकिय अधिकारी उपलब्ध होईल त्या दिनांकापर्यंत यापैकी जे आगोदर घडेल तो पर्यंत राहील.

२.सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने त्यांना नियमित वैद्यकिय अधिका-यासारखे म.ना.से. (रजा) नियम लागु राहणार नाही. तसेच ते विमा योजना, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणतीही सेवा विषयक इतर लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाही.त्यांना वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही.

३.सदर कंत्राटी नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने त्यांना सदर पदावर भविष्यात कायम करण्यात येणार नाही व त्या पदावर त्यांना धारणाधिकारी असणार नाही.

४.शासन सेवा शर्ती खाली ही सेवा नसल्याने त्याअनुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन एनपिएस, विमा योजना,भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोण्यत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास पात्र राहणार नाहीत. वैद्यकिय अधिका-यांची नियुक्ती कंत्राटी स्वरुपाची असल्याने सदर पदावर कायम करण्याबाबत भाविष्यात अधिकार राहणार नाही.अथवा त्यासाठी न्यायालयात दाद मागता येणार नाही. अशा आश्याचे बंधपत्र रु:१०० स्टंपपेपरवर घेण्यात येईल.

५.सदर कंत्राटी तात्पुरती दिलेल्या उमेदवाराची भविष्यात विहीत मार्गाने नियमित पदावर नियुक्ती झाल्यास सदरची तात्पुरची सेवा त्यांच्या नियमित सेवेस जोडुन दिली जाणार नाही.

६.केवळ तात्पुरत्या कंत्राटी नियुक्ती दिलेल्या उमेदवाराची कंत्राटी सेवा अर्हताकारी सेवा म्हणुन गणण्यात येणार नाही किंवा सेवा जेष्ठता व अन्य कोणत्याही प्रकारच्या सेवाविषयक बाबीसाठी ग्राहय धरली जाणार नाही.

७.निवड झालेल्या तदर्थ वैद्यकिय अधिकारी यांना मुख्यालयात राहणे बंधनकारक आहे.तसेच त्यांचे बायोमेट्रीक प्रणालीवर हजेरी लावणे अनिवार्य आहे.

८.सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांनी सेवेत असताना गैरवर्तन/गैरव्यवहार केल्यास निदर्शनास आल्यास कोणताही पूर्वसुचना न देता त्यांचा सेवा तात्काळ समाप्त करण्यात येतील व त्यांना पुन्हा नियुक्ती देण्यात येणार नाही.

९.सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांना सेवाकाळात सेवामुक्त व्हावयाचे असल्यास त्यांना एक महीन्याची नोटीस किंवा एक महीन्याचे मानधन भरुन कार्यमुक्त होता येईल.

१०.शासन आदेश क्र.मवैअ/२०२०/प्र.क्र.१५२/सेवा-३/दि.२९ मे २०२० मध्ये नमुद केल्याप्रमाणे आदिवासी व दुर्गम भागात काम करणा-या एम.बी.बी.एस. पात्रताधारकांना दरमहा रु.८०,०००/- व इतर भागासाठी रु.७५,०००/- इतके एकत्रित मानधन दिले जाईल. तसेच शासन निर्णयात उर्वरित नमुद अटी व शर्ती बंधनकारक राहतील.वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्यासबाबत रु.१००/- चे स्टॅम्पेपरवर करारनामा करण्यता येईल.

**११**.शासन निर्णय क्र. मवैअ-१०५४/प्र.क्र.२४१/भाग-२/सेवा-३/ दि.०४ जुलै-२०१९ चे शासन निर्णयान्वये सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत (प्राथमिक आरोग्य केंद्रात) महाराष्ट्र वैद्यकिय व आरोग्य सेवा, गट-अ या संवर्गातील रिक्त पदे नियमित वैद्यकिय अधिकारी उपलब्ध होईपर्यंत कंत्राटी पध्दतीने एम.बी.बी.एस. अर्हताधारकांमधुन प्राधान्याने भरण्यात येतील.

१२.सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांक मवैअ/प्रक्र२४१/ सेवा ३ दिनांक २ मार्च, २०१५चे अनुषंगाने या नंतर रिक्त होणा-या रिक्त पदा करिता दर महिण्याच्या १५ तारखेला मुलाखती ठेवण्यात येईल वरिल दिनांकास शासकिय सुटी असल्यास दुस-या कार्यालयीन दिवशी थेट मुलाखती (Walk in Interview)व्दारे पदे भरण्यात येतील तसेच जाहीरात प्रसिध्द झाल्यापासुन पदे पुर्ण भरे पर्यंत ग्राहय धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

उमेदवारांना मुलाखतीस येताना सोबत एम.बी.बी.एस.व विशेषज्ञ पदव्युत्तर पदवी /पदविका यांचे सर्व वर्षांचे गुणपत्रिक,पदविका/पदवी प्रमाणपत्र,वैद्यकिय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र,नुतणीकरण प्रमाणपत्र,वयाचा दाखला, अनुभव प्रमाणपत्र, संगणक प्रमाणपत्र, अलीकडील पासपोर्ट साईजचा फोटो व इतर आवश्यक प्रमाणपत्रांची मुळ व छायांकित प्रतींचा एक संच, फोटो असलेले ओळखपत्र इत्यादी सोबत घेऊन येणे आवश्यक आहे. उमेदवारांचे वय ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे तसेच अनाधिकृत गैरहजर असलेल्या/ संपामध्ये सहभागी असलेले/शासन सेवेत शिस्तभंग कार्यवाहीकरीता काढुन टाकलेले वैद्यकिय अधिकारी यांना अर्ज करता येणार नाही. तसेच प्राप्त अर्जाची संख्या जास्त असल्यास रिक्त पदांच्या संख्येनुसार १:५ प्रमाणे गुणानुक्रमे प्रथम असणा-या उमेदवारांना मुलाखतीस बोलविण्यात येईल. सदर भरतीबाबतचे सर्व निर्णय घेण्याचे अधिकार निवड समितीकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत.पदव्युतर पदवी व पदविका धारक उमेदवारीचा प्राधान्य देण्यात येईल
शासकिय सेवेतील कामाच्या अनुभवास प्राधान्य राहील

**अ) शैक्षणिक अर्हता:-** १) वैद्यकिय अधिकारी गट-अ (एम.बी.बी.एस.)
**ब) थेट मुलाखतीचे ठिकाण :- यशवंतराव चव्हाण सभागृह जिल्हा परिषद जालना**

(टिप- उमेदवारांनी आपल्या मुळ शैक्षणिक कागदपत्रासह तसेच २ साक्षांकित प्रतिसह मुलाखतीला उपस्थित रहावे. या करीता नोंदणी सकाळी १०.०० ते १.०० वाजेपर्यंत राहील. त्यानंतर आलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.)

**सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती**
**तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जालना**

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

जिल्हास्तरीय निवड समिती, द्वारा आरोग्य विभाग जिल्हा परिषद जालना

## अर्जाचा नमुना

फोटो

कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करणेसाठी पात्र व इच्छुक उमेदवाराने भरावयाचा अर्ज

१) उमेदवारांचे संपुर्ण नाव (आडनाव प्रथम):-

२) जन्मतीरीख.........................................अर्जाच्या दिनांकास :-...........................

(दिनांक) (महीना) (वर्ष)

३) जात /पोटजात/प्रवर्ग (प्रवर्गाचा स्पष्ट उल्लेख करावा:-

जातपडताळणी प्रमाणपत्र क्रमांक:-

४) शैक्षणिक अर्हता:- एम.बी.बी.एस

५) एम.बी.बी.एस. उत्तीर्ण केलेल्या महाविद्यालयाचे नाव:-

६) महाराष्ट्र वैद्यकिय परिषद (एमएमसी) येथे कायम नोंदणी केल्याचा दिनांक:-

७) पदव्युत्तर पदवी/पदविका/ अर्हताधारक असल्यास विषय:-

८) एम.बी.बी.एस. परिक्षेतील गुण खालील प्रमाणे-

| अ.क्र | वर्ष | उत्तीर्ण झालेले वर्ष | प्रयत्न संख्या | पैकी गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रथम वर्ष | | | | | |
| २ | द्वितीय वर्ष | | | | | |
| ३ | तृतीय वर्ष-१ | | | | | |
| | तृतीय वर्ष-२ | | | | | |
| | तृतीय वर्षाचे एकुण | | | | | |

९) सार्वजनिक आरोग्य विभागातील काम केल्याचा अनुभव असल्यास कालावधीः-
अनुभवाचा तपशिल

| अ.क्र | काम केलेल्या कार्यालयाचे नाव | पद | एकुण कालावधी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

१०) तात्पुरत्या पत्रव्यवहाराचा पत्ता, संपर्क क्रमांक व ईमेल आडीः-

११) कायमचा पत्ताः-

१२) बंधपत्रित/अबंधपत्रित (बंधपत्रित असल्यास कॉलेजचे पत्र व परिमंडळाचे ना हरकत पत्र जोडावे)

वर नमुद केलेला तपशिल माझ्या माहीतीप्रमाणे सत्य व अचुक आहे. मी प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहीती खोटी अगर चुकीची आढळुन आल्यास नोकरी गमाविण्यास व त्या अनुषंगाने होणा-या इतर कार्यवाहीस पात्र व बांधील राहीन.

**दिनांक :   /   /२०२६**
**ठिकाणः**

**उमेदवाराची स्वाक्षरी**
**(उमेदवाराचे संपुर्ण नांव)**

खालील प्रमाणे साक्षांकित करुन अर्जासोबत जोडलेल्या आहेत.

१.जन्मतारखेचा दाखल/ १० वी पास प्रमाणपत्र

२.एम.बी.बी.एस. उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र, पदवी प्रमाणपत्र व गुणपत्रिका

३.पदव्युत्तर पदवी/ पदविका गुणपत्रिका व प्रमाणपत्र

४.महाराष्ट्र वैद्यकिय परिषदेचे कायम नोंदणी व नुतणीकरण केल्याचे प्रमाणपत्र (एमएमसी)

५.आंतरवासियता प्रमाणपत्र

६.जातीचे प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र,

७.अनुभव असल्यास दाखला-प्रमाणपत्र

८.अॅटेम्प्ट सर्टिफिकेट

# <u>जाहीर प्रगटन</u>

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद जालना, अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी वैद्यकिय अधिकारी गट-अ ०६ पदे कंत्राटी स्वरुपात (फक्त ११ महीण्याचे कालावधीसाठी) भरणे करिता दिनांक २२/०९/२०२६ ते २८/०९/२०२६ पर्यंत आरोग्य विभाग, जिल्हा परिषद जालना या कार्यालयात सादर केलेल्या उमेदवारांनी दिनांक २९/०९/२०२६ रोजी मुलाखतीस (Interview) हजर राहवे. तसेच सदरची जाहीरात **www.jalna.nic.in** व **https://zpjalna.maharashtra.gov.in** या अधिकृत प्रसिध्द करण्यात आली आहे.

तरी एम.बी.बी.एस. अर्हता धारकांनी त्यांना प्राप्त झालेले गुण, अतिरिक्त शैक्षणीक पात्रता, अनुभवधारक उमेदवारांनी आपल्या मुळ कागदपत्रांसह थेट मुलाखातीसाठी दिनांक २९/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता कै. यशवंतराव चव्हाण सभागृह जिल्हा परिषद जालना येथे उपस्थित रहावे.

स्वाक्षरीत/-

सदस्य सचिव<br>
जिल्हा निवड समिती तथा<br>
जिल्हा आरोग्य अधिकारी<br>
जिल्हा परिषद जालना

अध्यक्ष<br>
जिल्हा निवड समिती तथा<br>
जिल्हाधिकारी<br>
जिल्हाधिकारी कार्यालय जालना